# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 29/02/2020 (शनिवार)
## (सकाळ)

---

### फसवणुक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत नवीन नांदा येथे दिनांक 13/11/2019 चे 11.00 वा. ते दिनांक 12/12/2019 चे 11.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– हर्ष गणेशजी डहाट, वय 19 वर्ष, रा. नविन नांदा ता. कामठी याने लोन करीता ऑनलाईन अप्लाय केले होते. यानंतर फिर्यादी यास महिंद्रा फायनान्स प्रायव्हवेट लिमिटेड बैंक मधुन कॉल आला व अज्ञात आरोपीतांनी लोन देतो असे सांगुन गुगल पे व्दारे एकुण 62,000/–रू. फोनव्दारे फिर्यादींकडुन ट्रान्सफर करवुन घेतले व फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मेश्राम 9823453169 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. बोरी :– आरोपी नामे– सागर नंदु भुते, वय 25 वर्श, रा. बोरखेडी रेल्वे हा सन 2016 पासुन 15 वर्षीय फिर्यादी/पीडित हिचा पाठलाग करून ''तु मला आवडतेस माझे तुझ्यावर प्रेम आहे.'' असे नेहमी म्हणत होता. दिनांक 27/02/2020 चे 19.30 वा. दरम्यान पीडिता हि दुकानात जात असतांना आरोपीने पाठलाग करून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व ''तु माझी नाही झाली तर आत्महत्या करणार व या बाबत तु जबाबदार राहशिल अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड), 506 भादंवी. सहकलम 12 बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपानि थोरात 8623074000 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर